# भारतीय महाविद्यालय, अमरावती

## शारीरिक शिक्षण विभाग

## वार्षिक अहवाल

**सत्र 2017-2018**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित व विविध महाविद्यालयामधे एक नाव लौकिक प्राप्त आणि विविध परंपरा जोपासणारे अग्रगण्य महाविद्यालय म्हणून भारतीय महाविद्यालयाचा उल्लेख केला जातो. शारीरिक शिक्षण विभागाचा अहवाल आपणासमोर ठेवतांना अत्यंत आनंद होत आहे. या महाविद्यालयाने अभ्यासासोबतच सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ व क्रीडा, यामध्ये सहभागी होण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांना सतत प्रोत्साहन दिले आहे. या प्रोत्साहनाचे रूपांतर विद्यार्थ्यांनी यशामधे करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे व महाविद्यालयाने या सर्व क्षेत्रात उत्तम यश मिळविले आहे आणि दिवंसेदिवस शारीरिक शिक्षण विभागाची होत असलेली प्रगतीपथावरील वाटचाल या अहवालाव्दारे आपणासमोर ठेवण्यात येत आहे. या सर्व प्रकारच्या उपक्रमात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमाने विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. व्ही. रूईकर तसेच प्रा. डॉ. कु. संगिता देशमुख, प्रा. डॉ. विक्रांत वानखडे यांचे मार्गदर्शनाखाली आपल्या महाविद्यालयाचे वर्चस्व कायम ठेवले आहे. 2003 मधे प्रथम नॅक समीतीने महाविद्यालयातील एक उत्कृष्ठ विभाग म्हणून गौरविले होते. तसेच 2012 मधे पुर्नमुल्यांकनाकरिता आलेल्या व्दितीय नॅक समीतीने Department of Excellence म्हणून सन्मानित केले होते. तोच गौरव कायम ठेवण्याचा प्रयत्न या विभागाने वर्ष 2017—18 मधे केला आहे.

यावर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे आयोजित विविध स्पर्धा, खेळ व क्रीडा, प्रकारापैकी 25 क्रीडा प्रकारामध्ये सहभाग घेतला यामधे 180 विद्यार्थी/विद्यार्थीनी सहभागी झाले होते. त्यामधील एकुण 08 विद्यार्थी/विद्यार्थीनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विविध चमुमधे निवडले गेले.

तसेच विद्यापीठ स्पर्धासोबतच काही विद्यार्थ्यांनी राज्य, राष्ट्रीय स्तरावरही स्थान मिळविले आहे. यात राज्य स्तरावर एकुण 04 व राष्ट्रीय स्तरावर एकुण 01 विद्यार्थी/विद्यार्थीनी विविध चमुमधे निवडले गेले. यामधे रोशन जाधव या विद्यार्थ्याने चंदिगढ (पंजाब)येथे झालेल्या राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेत स्वर्ण पदक प्राप्त केले आहे. तसेच महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी कु. वृषाली गोरले हीला आर्चरी या खेळाचा महाराष्ट्र शासनाचा शिव छत्रपती पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या या यशाने व निवडीने महाविद्यालयाला नाव लौकिक प्राप्त करून दिला आहे.

सत्र 2009—2010 पासुन महाविद्यालयामधे विद्यार्थ्यांकरिता अद्यावत उपकरणांनी सज्ज अशी व्यायामशाळा सूरू करण्यात आली असून त्याव्दारे चालू सत्रामधे विद्यार्थ्यांना पोलीस भरतीकरिता शारीरिक क्षमता चाचणीसहीत निशुल्क मागदर्शन करण्यात आले व याचा फायदा होवून विद्यार्थी भविष्यातील पोलीस भरतीकरिता शारीरिक क्षमता चाचणी मधे उत्तीर्ण होतील अशी आशा आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये स्थानिक हनुमाान व्यायाम प्रसारक मंडळाचे तसेच मुधोळकर पेठ युवक व क्रीडा मंडळाचे योगदान, मार्गदर्शन अत्यंत महत्वाचे आहे. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना सरावाकरिता मैदाने उपलब्ध करून दिलीत, मंडळातील प्रशिक्षक, प्राचार्य डॉ. देबनाथ सर, प्रा. डॉ. खंडागळे सर, प्रा. डॉ. योगेश निर्मळ, प्रा.संजय तिरथकर, प्रा. मधुकर बुरनासे, डॉ. नितीन चवाळ यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## भारतीय महाविद्यालय, अमरावती
## सत्र 2017–2018 मध्ये आंतरविद्यापीठ स्पर्धाकरिता निवड झालेले विद्यार्थी

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | खेळाचे नाव | स्थान | प्राप्त पदक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सुमित बाबा टाले | बी.कॉम.भाग 2 | जलतरण | पंजाब विद्यापीठ,चंदिगढ(पंजाब) | |
| 2 | कु. आदिती विजय काळे | बी.कॉम.भाग 2 | बास्केटबॉल | आय. टी. एम. विद्यापीठ,ग्वालीयर(मध्यप्रदेश) | |
| 3 | कु. माधुरी सुनिल ससानकर | बी.कॉम.भाग 2 | बास्केटबॉल | आय. टी. एम. विद्यापीठ,ग्वालीयर(मध्यप्रदेश) | |
| 4 | पंकज गजानन कलाने | एम.कॉम.भाग 2 | बेसबॉल | महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक (हरीयाणा) | |
| 5 | शुभम अरूण चव्हाण | एम.कॉम.भाग 1 | सॉफ्टबॉल | लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ जालंदर(पंजाब) | |
| 6 | कु.प्रतिक्षा भुजंगराव यादगिरे | बी.एस.सी.भाग 2 | सॉफ्टबॉल | गुरूनानक देव विद्यापीठ,अमृतसर(पंजाब) | |
| 7 | कु. श्वेता विनोद कोल्हे | बी.ए.भाग 2 | आर्चरी | कंलीगा इंस्टीटयुट, भुवनेश्वर (ओरीसा) | |
| 8 | कु. सुनयना सुभाष लांजेवार | बी.एस.सी.भाग 1 | हॉकी | गुजरात टेक्नॉलॉजीकल विद्यापीठ,अमहदाबाद गुजरात) | |

## सत्र 2017–18 मध्ये राष्ट्रिय क्रीडा स्पर्धाकरीता निवड झालेले विद्यार्थी

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | खेळाचे नाव | स्थान | प्राप्त पदक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रोशन जाधव | बी.ए.भाग 1 | तायक्वांडो | चंदिगढ | स्वर्ण पदक |

## सत्र 2017–2018 मध्ये राज्यस्तरीय स्पर्धाकरीता निवड झालेले विद्यार्थी

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | खेळाचे नाव | स्थान | प्राप्त पदक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कु. श्वेता विनोद कोल्हे | बी.ए.भाग 3 | आर्चरी | पुणे | |
| 2 | कु. सलीला जोशी | बी.एस.सी.भाग 2 | जलतरण | पुणे | |

## सत्र 2017–18 मध्ये राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव स्पर्धाकरीता निवड झालेले विद्यार्थी

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | खेळाचे नाव | स्थान | प्राप्त पदक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कु. आदिती विजय काळे | बी.कॉम.भाग 2 | बास्केटबॉल | दापोली (महाराष्ट्र) | |
| 2 | कु. माधुरी सुनिल ससानकर | बी.कॉम.भाग 2 | बास्केटबॉल | दापोली (महाराष्ट्र) | |

## आंतर महाविद्यालयीन तसेच आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता कार्य केलेले शिक्षक 2017–2018

### प्रा. डॉ. दिवाकर रूईकर (विभागप्रमुख, शारीरिक शिक्षण विभाग)

- आर. डी. आय. के. महाविद्यालय, बडनेरा, येथे झालेल्या आतंरमहाविद्यालयीन क्रॉस कंन्ट्री (मुले/मुली) स्पर्धेकरिता तांत्रीक समिती सदस्यपदी निवड व कार्य.
- बि. एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे झालेल्या आतंरमहाविद्यालयीन खो–खो (मुली) स्पर्धेकरिता आयोजन समिती सदस्य व तांत्रीक समिती प्रमुखपदी निवड व कार्य.
- नेहरु कॉलेज, नेरपरसोपंत येथे झालेल्या आतंरमहाविद्यालयीन योगासन (मुले/मुली) स्पर्धेकरिता तांत्रीक समिती प्रमुख व व्यवस्थापक पदी निवड व कार्य.

**प्रा. डॉ. संगीता देशमुख संचालक, ( शारीरिक शिक्षण विभाग)**

- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ टेबल टेनिस (मुले/मुली) चमू निवड समितीचे सदस्य म्हणून निवड व कार्य

**प्रा.डॉ. विक्रांत वानखडे संचालक, (शारीरिक शिक्षण विभाग)**

- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कबडडी मुले चमूचे करिता व पंडीत दिनदयाल उपाध्याय शेखवती विद्यापीठ, सिकर (राजस्थान)येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबडडी मुले स्पर्धेकरिता व्यवस्थापक म्हणून निवड व कार्य.
- आर. डी. आय. के. महाविद्यालय, बडनेरा, येथे झालेल्या आतंरमहाविद्यालयीन क्रॉस कंन्ट्री (मुले/मुली) स्पर्धेकरिता तांत्रीक समिती सदस्यपदी निवड व कार्य.

**प्रा. डॉ. दया पांडे ;विभागप्रमुख, समाजशास्त्र (विभाग)**

- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ जुडो (मुले/मुली) चमू निवड समितीचे सदस्य म्हणून निवड व कार्य

**विभाग प्रमुख**
**शारीरिक शिक्षण विभाग,**
**भारतीय महाविद्यालय,अमरावती**